# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या बुधवार दि. ९ नोव्हेंबर २०११ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १४४ वी बैठक बुधवार दि.९ नोव्हेंबर २०११ रोजी दुपारी ३.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. महेंद्र वारभुवन | उप सभापती तथा मुख्य अधिकारी |
| २) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ३) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| ४) | मा.श्री.व्ही.जी.नायर | सदस्य |
| ५) | मा.श्री. नंदकुमार काळे | सदस्य |
| ६) | मा.श्री.तारिक फारुकी | सदस्य |
| ८) | मा.श्री.कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ९) | उपकर निर्धारक व संकलक, म.न.पा. | निमंत्रक |
| १०) | कार्यकारी अभियंता इमारत प्रस्ताव,म.न.पा. | निमंत्रक |
| ११) | डॉ.श्री.ल.पुलकुंडवार, | अवर सचिव/महाराष्ट्र शासन |
| १२) | डॉ.श्री.रमेश सुरवाडे | सहमुख्य अधिकारी |
| १३) | श्री.प्रल्हाद महिषी,निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |

बैठकीच्या सुरुवातीस मा.श्री.महेंद्र वारभुवन मुख्य अधिकारी/मुं.इ.दु.व पु.मंडळ यांनी सर्व सन्मा.सदस्यांचे स्वागत करुन बैठकीचे कामकाजास सुरुवात करणेबाबत श्री.प्रल्हाद महिषी,सचिव तथा निवासी कार्यकारी अभियंता यांना सूचना केली.

सचिव श्री.महिषी यांनी सर्व सन्मा.सदस्यांचे स्वागत करुन आजची बैठक मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी मा.श्री.महेंद्र वारभुवन यांचे अध्यक्षतेखाली व त्यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

**बाब क्रमांक - १४४.१**

**विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि.१९/ १०/२०११ रोजी झालेल्या १४३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.**

-------------

मागील बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते २० वर सादर करण्यांत आले आहे.

बैठकीच्या सुरुवातीस सचिव यांना सन्मा सदस्य मा.श्री.कमरुद्दीन मर्चंट यांनी त्यांची उपस्थीती मागील बैठकीच्या कार्यवृत्तांतमध्ये करण्याचे राहून गेल्याचे निदर्शनास आणून दिले. त्याबद्दल सचिव श्री.महिषी यांनी दिलगिरी व्यक्त करुन सदर नांव इतिवृत्तात सुधारणा ग्राहय धरण्यांत येईल, असे आश्वासन दिले.

बैठकीच्या सुरुवातीस सन्मा सदस्य श्री. किसन जाधव यांनी मागील कार्यवृत्तांमध्ये पृष्ठ क्र.२ वर १९२ ऐवजी २९१ पाहिजे असल्याने सदर बाबतीत सुधारणा करण्याबाबत सुचविले त्यानुसार सुधारणा करण्यांत आली. मागील बैठकीतील २९१-ताडदेव इमारतीच्या बाबत मुद्दा उपस्थित केला होता की, तेथे कश्याप्रकारे त्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. तेथे अशी बाब निदर्शनास आली आहे की, त्या इमातीमध्ये मूळ भाडेकरु कमी होते परंतु विकासकांनी चुकीचे कागदपत्र सादर केलेले आहे व बांधकामही परवानगी प्रमाणे झाल्याचे निदर्शनात येत नाही. तसेच यामध्ये एकही मूळ भाडेकरु रहात नसल्याचे निदर्शनास आलेले आहे, विकासकाने मूळ रहिवाशांना बाहेर काढून त्यांचे जागी नवीन रहिवाशांना सामावून घेतलेले आहे. तरी ही बाब तपासावी व त्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यांत यावी असे सुचविले.

श्री.सेठ, उपमुख्य अभियंता यांनी याबाबत खुलासा केला की, सदर इमारतीची प्रत्यक्ष पहाणी केली असून, इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. सदर इमारतीत एकूण १० रहिवाशी होत त्यापैकी ८ अनिवासी व २ निवासी, सध्या इमारतीत रहाणा-या रहिवाशांची सर्व माहिती एकत्रित करण्यांत आलेली आहे. त्याचा अहवाल तयार करण्याचे काम सुरु आहे. इमारत १९ मजल्याची बांधण्यात आलेली असून, सदर इमारतीस अजून ओ.सी. देण्यांत आलेली नसून विकासकाने ओ.सी.साठी पत्र दिलेले आहे. त्यामुळे सर्व बाबींची तपासणी झाल्यानंतर ओ.सी. देणेबाबत ना हरकत प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही मंडळातर्फे करण्यांत येईल.

यावर मा.मुख्य अधिकारी /मुं.इ.दु.व पु.मं.यांनी श्री.सेठ,उपमुख्य अभियंता यांना सूचना केली की, याबाबत सखोल चौकशी करुन अहवाल पुढील बैठकीत सादर करण्यांत यावा.

तसेच सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी मा.अध्यक्ष यांचे असे निदर्शनास आणून दिले की, मागील बैठकीमध्ये इतिवृत्तामध्ये टंकलेखित ठराव क्र.१४३/१२७६ व पुढील दोन ठरावही १२७६ असू चुकीचे नमूद झाले आहे ते कृपया सुधारणात यावेत.

सचिव,श्री.महिषी ांनी याबाबत दिलगिरी व्यक्त केली, कॉपीराईटिंग सदर चुक झालेली आहे. तरी कृपया बाब क्र.१४३(९) ठराव क्र. १४३/१२७७, बाब क्र.१४३(१०)

ठराव क्र.१४३/१२७८ व बाब क्र.१४३(११) ठराव क्र.१४३/१२७९ असे वाचावे, अशी सर्व सन्मा.सदस्य व उपस्थित सर्व अधिका-यांना विनंती केली.

यानंतर सन्मा सदस्य श्री.किसन जाधव यांनी डी.एस.आर.सुधारणेबाबत पुढे काय कार्यवाही झाली याची चौकशी केली व हा मुद्या मागील दोन तीन बैठकीमध्ये चर्चीला गेलेला असून यावर अंतिम कार्यवाही होणे अपेक्षित आहे, असे सांगितले.

श्री.महिषी, सचिव यानी सदर प्रकरणी मा.मुख्य अभियंता-१/प्राधिकरण यांचेस्तरावर डी.एस.आर.सुधारित करणेबाबत बैठक घेण्यात आली असून, प्रत्येक बाबींचे दर विश्लेषण करण्याकरिता सर्व उपमुख्य अभियंता यांना देण्यात आले आहेत. त्यापैकी उपमुख्य अभियंता- परिमंडळ- १, ३ व ४ / मुं.इ.दु.व पु.मंडळ यांचेकडून अहवाल प्राप्त झालेला असून,परिमंडळ-२ चा अहवाल लवकरच प्राप्त होईल अशी अपेक्षा आहे.त्यांचेकडून प्राप्त झाल्यानंतर सर्व अहवाल एकत्रित करुन डी.एस.आर. सुधारणा करण्याकरिता मा.मुख्य अभियंता/प्राधिकरण यांना प्रस्ताव सादर करण्यांत येईल.

यानंतर सन्मा सदस्य श्री.किसन जाधव यांनी डी.एस.आर.सुधारणेबाबत अंतिम कार्यवाही आमचे कालावधीत पूर्ण होईल, अशी अपेक्षा होती परंतु तशी कार्यवाही पूर्ण झालेली नाही. परंतु ती लवकरच पूर्ण करावी अशी विनंती केली.

मा.मुख्य अधिकारी/मुं.इ.दु.व पु.मं.यांनी अश्या सुचना केल्या की,ही सर्व कार्यवाही १ ते दीड महिन्यात पूर्ण करावी.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी व्हॅकेशन नोटीसचा नमुना फारच चांगल्याप्रकारे बनविल्याचे सांगितले पुढे त्यांनी असे सुचविले की, अशाच प्रकारे आपल्या वितरण पत्रातही ब-याच त्रुटी आहेत. त्यामध्येही बदल होणे गरजेचे आहे. त्यामुळे व्हॅकेशन नोटीसप्रमाणे वितरण पत्राचाही नमुन्यामध्ये फेरबदल करुन नवीन नमुना तयार करण्यात यावा असे मागील बैठकीत सांगितले होते त्याबाबत कार्यवाही सुरु असल्याचे आम्हाला अवगत आहेच तरी याबाबत लवकरात-लवकर कार्यवाही होणेबाबत मा.अध्यक्ष महोदयांना विनंती केली.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सारस्वत बॅकेमार्फत जी भाडेवसुली होत आहे, त्यास प्रतिसाद चांगला मिळत असून त्यासाठी आपण भाडेकरु/रहिवाशांनी, जर तीन महिन्याचे भाडे एकदम भरल्यास त्यांना जी ३ टक्के सवलत द्यावयाची आहे, तो प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्यांत आलेला होता.सदर प्रस्तावास प्राधिकरणाची मंजूरी प्राप्त झालेली आहे असे समजले तरी याबाबतही लवकरच कार्यवाही व्हावी. तसेच याबाबतचे एक माहितीपत्रक काढून सर्व इमारतीमध्ये नोटीस फलकावर लावण्यांत यावे, कारण आजपर्यंत कितीतरी रहिवाशी/भाडेकरुंना सारस्वत बॅंकेमध्ये भाडेवसुली मंडळातर्फे होत आहे ही बाब माहित नसल्याचे निदर्शनास आले आहे.तरी याबाबतही कार्यवाही व्हावी.तसेच त्यांनी

असाही मुद्दा उपस्थित केला की एका प्रभादेवी येथील एका इमारतीत मंडळातर्फे एक भाडेवसुलीकार जावून सारस्वत बँकेत भाडे न भरता माझेकडे भरावे अशी रहिवाशांची दिशाभूल करीत आहे.तरी याबाबतही कार्यवाही व्हावी.

यावर सहमुख्य अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की,सदर विषय प्राधिकरणाच्या बैठकीत घेतल्यानंतर त्यावर चर्चा होवून , चर्चेअंती असा निर्णय झाला की, सारस्वत बँकेमार्फत जी भाडेवसुली होत आहे त्यास चांगला प्रतिसाद मिळत असल्यामुळे व भाडेकरु / रहिवाशी जर एक वर्षाचे भाडे एकदम भरत असतील तर त्यांना ही सवलत ३ टक्के न देता बॅकांकडून प्राप्त होणारे व्याज एवढी देणेबाबत विचार करण्यांत आलेला आहे. तथापि याबाबत प्राधिकरणाचा ठराव प्राप्त झाल्यानंतर त्यातील तरतुदीनुसार कार्यवाही करावी लागेल.

याबाबत किती सवलत द्यावी हा निर्णय घेण्याचा अधिकार मा.उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना प्रदान करण्यांत आलेला आहे.याबाबत अंतिम निर्णय झाल्यानंतर त्याबाबत माहितीपत्रक तयार करण्यांत येवून ते सर्व इमारतीत वाटण्यांत येईल.जेणेकरुन सर्व रहिवाशांना सारस्वत बँकेमध्ये भाडे भरण्याबाबत व त्यामुळे त्यांना मिळणा-या सवलतीबाबत अधिक माहिती मिळू शकेल तसेच त्यामध्ये त्यांचे किती भाडे शिल्लक आहे व किती रक्कम भरावयाची आहे. ाचीही माहिती भाडेकरु/रहिवाशांना मिळू शकेल.कारण सध्या ते नुसतेच बँकेत जावून भाडे भरत आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी मा.अध्यक्ष यांचे असे निदर्शनास आणून दिले की, मागील बैठकीमध्ये एक अभ्यास गट संघटित करण्यांत आलेला होता त्यामध्ये मंडळाचे सन्मा.सदस्य तसेच श्री.अर्गेकर, तत्कालिन उपमुख्य अभियंता हे निमंत्रक होते. या अभ्यास गटाने एक अहवाल तयार केला होता.सदर अहवालाबाबतची कार्यवाही कितपर्यंत झालेली आहे. अहवाल आजपर्यंत मंडळाच्या बैठकीत का ठेवण्यांत आलेला नाही.

यावर श्री. महिषी, सचिव यांनी स्पष्टीकरण केले की, अभ्यास गटाने सादर केलेला अहवालातील मुद्यांबाबत काही सुचना अभिप्राय असल्यास कळविण्याबाबत मंडळाच्या सर्व उपमुख्य अभियंता, परिमंडळ- १,२,३ व ४ व कार्यकारी अभियंता यांना अहवाल पाठविले का आहे.नुकताच काही उपमुख्य अभियंत्याचा अहवाला प्राप्त झालेला आहे. सर्व अहवाल प्राप्त झाल्यावर ते एकत्रित करुन प्रस्ताव शासनाकडे पाठविणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

यावर सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी असे मत मांडले की, सदर प्रस्ताव प्रथम मंडळाच्या बैठकीत सादर केला असता तर त्यावर चर्चा होवून काही सुधारणा करता आल्या असत्या याकरिता सदर प्रस्ताव लवकरच मंडळाच्या बैठकीत ठेवण्यांत यावा, नंतर

शासनास सादर करणेबाबतची कार्यवाही करण्यांत यावी. ही बाब महत्वाची असल्यामुळे याबाबत लवकरात- लवकर कार्यवाही व्हावी, अशी विनंती केली.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी सभागृहाच्या असे निदर्शनास आणून दिले त्यांच्या विभागातील भटचाळ, ताडदेव या विभागातील इमारतीस सन २००३ साली एनओसी देण्यांत आलेली असून त्या इमारतीची अत्यंत वाईटस्थिती असून विकासक त्याबाबत काही करीत नाही. तसेच त्यांनी असेही मंडळासमोर आणून दिले की, जर एनओसी देवून आठ वर्षाच्या कालावली जात असेल, तर मंडळातर्फे पुनर्विकासाचे काम कशा प्रकारे होणार याबाबत खंत व्यक्त केली, पुढे त्यांनी श्री.सेठ,उपमुख्य अभियंता हे याबाबत चौकशी करुन अहवाल सादर करणार होते, तरी त्यांनी याबाबत माहिती देणेबाबत विनंती केली.

श्री.शेठ, उपमुख्य अभियंता यांनी स्पष्ट केले की,याबाबत विकासक व रहिवाशी यांची एकत्रित सुनावणी घेण्यांत आलेली असून,पुढील आठवडयात दि.२१/१०/२०११ रोजी मा.मुख्य अधिकारी यांचेकडेही भाडेकरु व विकासक यांचेसह सुनावणी घेण्यांत येणार आहे. आतापर्यंत तीन सुनावणा घेण्यांत आलेल्या असून, याबाबत नकाशे दुरुस्ती करुन मान्यतेसाठी पाठविण्यात आलेले आहे.नकाश्यामध्ये रहिवाशांनी काही त्रुटी असल्याचे निदर्शनास आणल्यामुळे, भाडेकरु व विकासक यांचेमध्ये वाद सुरु आहे. त्यामधून लवकरच काही मार्ग काढण्याचा प्रयत्न सुरु आहे.तसेच विकासक काम सुरु करण्यास तयार आहे.तसेच आयोडीस अजून सहा महिन्याचा कालावधी आहे. परंतु भाडेकरु/रहिवाशी बांधकामास तयार नसून जोपर्यंत नकाशे दुरुस्त होवून येत नाही तसेच नवीन करारनामा होत नाही, तोपर्यंत काम सुरु करण्यास भाडेकरु/रहिवाशी तयार नसल्यामुळे सदर इमारतीचे पुनर्विकासाचे काम प्रलंबित आहे. महानगर पालिकेकडून नकाशे मंजूरी झाल्यानंतर पुढील कार्यवाही मंडळातर्फे करणे शक्य होईल.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी यावर असे सांगितले की, विकासकाची जबाबदारी आहे की, त्यांनी भाडेकरुंना सर्व सुविधा उपलब्ध करुन देणे विकासक ते करीत नाही, एकदा त्यांनी सर्व भाडेकरुं/रहिवाशाची जबाबदारी घेतली म्हणजे त्यांना आवश्यक सुविधा ज्या महत्वाचा असता त्या त्याने पूर्ण करणे गरजेचे आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी पुढे असे निदर्शनास आणून दिले की, डॉ.श्री.ल.पुलकुंडवार यांनी मागिल बैठकीत उमरखाडी येथील ९ इमारतीबाबतच्या प्रस्तावास शासनाची मंजूरी प्राप्त झालेली आहे.

त्याचधर्तीवर संकल्पसिध्दी ही इमारत मंडळाने १९८० पूर्वी बांधलेली असून, त्याइमारतीची दुरुस्तीही मंडळातर्फे करण्यांत आलेली आहे. या इमारतीची पहाणी त्यांनी व श्री.पाटील,कार्यकारी अभियंता यांनी एकत्रित केलेली आहे.त्यामुळे सध्या तेथील

रहिवाशांचे असे मत आहे की, जसे आपण पीएमजीपीतंर्गत बांधलेल्या इमारतीबाबत निर्णय घेतलेला आहे त्यांचा पुनर्विकास करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येत आहे, त्याचप्रमाणे या इमारतीत रहात असलेल्या भाडेकरु / रहिवाशानी तशा प्रकारचे पत्रही मंडळास दिलेले आहे. सदर इमारतीचा पुनर्विकास त्याच धरतीवर करण्यासाठी मंडळातर्फे करण्यांबाबत पत्र दिलेले आहे. याबाबत विचार होणे आवश्यक वाटते. तसेच स्वामीकृपा या इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रस्तावही सादर करणेबाबत कार्यवाही होणे गरजे आहे.कारण सदर इमारतीतील भाडेकरु १६५ ते १८० चौ.फूटाच्या गाळयात कित्येक वर्षे रहात आहे. तरी याबाबतही विचार होणे गरजेचे आहे. तसेच त्यांनी सर्व उपमुख्य अभियंत्याना विनंती केली की, आपआपल्या विभागातील अशा इमारतीबाबतचे प्रस्ताव तयार करुन ते शासनाकडे पाठविणेबाबत कार्यवाही करावी.

यावर मा श्री.पुलकुंडवार यांनी असे स्पष्ट केले की, पूर्वीच्या सोसायटीच्या अ-वर्गाच्या बिल्डींग ज्या डिसेस झाल्या आहेत त्यांचा पुनर्विकास करण्याबाबत सुचना काढली आहे. त्यानुसार अश्या इमारतीच्या पुनर्विकास करणे शक्य आहे. पुनर्विकास करण्याबाबतचे प्रस्ताव शासनाकडे निर्णय प्रलंबित असल्यामुळे त्यावर लवकर निर्णय अपेक्षित आहे, अंतिम निर्णय प्राप्त झाल्यानंतर अशा इमारतीचा पुनर्विकास करणेबाबतची कार्यवाही सुरु होईल.

यावर सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी स्पष्ट केले की, वरील प्रस्तावास मंजूरी प्राप्त झाल्यास अशा प्रकारच्या ब-याच इमारती आहे, पीएमजीपीतंर्गत बांधलेल्या ६६ इमारती असून तसेच गिरगाव मध्ये चार इमारती आहे तसेच संकल्पसिध्दी इमारतीमध्ये तर १६५ चौ.फूटाच्या सदनिका आहे तर अशा इमारतीबाबतही विचार व्हावा.

यावर डॉ.श्री.ल.पुलकुंडवार,अवर सचिव/ महाराष्ट्र शासन यांनी असे स्पष्ट केले की, उमरखाडीच्या प्रस्तावास शासनाची मंजूरी प्राप्त झालेली आहे व यापुढे शासनाकडे सादर होणारा प्रस्तावाना लवकरात-लवकर मंजूरी प्राप्त होणेकरिता शासनातर्फे जी काही मदत करणे शक्य आहे ती आम्ही करण्याची सर्वोतो पर्यंत करु, असे बैठकीत त्यांनी सर्वांना आश्वासन दिले.

यानंतर सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी श्री.शंकर पांर्टे सारख्या ब-याच व्यक्ती आज कित्येक वर्षे संक्रमण शिबिरात रहात असून , त्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने कार्यवाही होणे गरजेचे असल्याचे मागील बैठकीत सांगितले होते, कारण अशाच प्रकारे ब-याच इमारती अनधिकृतपणे उभ्या आहेत व त्यामध्ये अनधिकृत लोक रहात आहे. मात्र मूळ भाडेकरु/रहिवाशी हे वर्षांवर्षे संक्रमण शिबिरात रहात असून, त्यांचा काही दोष नसतांना त्यांना न्याय मिळण्याच्या दृष्टीकोनातून कार्यवाही होणे गरजेचे आहे.

याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेबाबतची कार्यवाही करण्यांत येणार होती, ती करण्यांत आलेली आहे का.

संक्रमण शिबिरात वर्षानुवर्ष रहात असलेल्या भाडेकरुंना बृहतसूचीवर घेण्याकरिता जी नियमावली बनविलेली आहे, त्याप्रमाणे पात्र व बृहतसूचीवर येण्यास इच्छुक असलेल्या रहिवाशांना रितसर बृहतसूचीवर घेण्यात येईल, सदरचे भाडेकरु/रहिवाशी हे मागील २० ते ३० वर्षे मंडळाच्या संक्रमण शिबिरात वास्तव्य करीत आहे. ही प्रक्रिया लवकरच सुरु करण्याबाबत मागील बैठकीत सूचना देण्यांत आलेल्या होत्या.

तद्नंतर सन्मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी असे निदर्शनास आणून दिले की, एमपी मिल कंपाऊड येथील रहिवाशांचे पुनर्वसन झालेले आहे परंतु आपण जे संक्रमण शिबिरातील गाळे विकासकास दिलेले होते. ते विकासकाने स्कीम पूर्ण झाल्यानंतर त्यांनी ते मंडळास परत करता त्याचा दुस-या योजनेसाठी परस्पर वापरत असल्याची तक्रार केली. संक्रमण शिबिरात भाडेकरुंची घुसखोरी झालेली आहे.

याबाबत सहमुख्य अधिकारी/ दु.व पु. मंडळ यांनी खुलासा केला की, सन्मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी उपस्थित केलेल्या मुद्याशी मी पूर्णपणे सहमत असून सदर विकासकाने सदरचे गाळे मंडळाच्या ताब्यात देवून त्याचे थकीत भाडेही भरले पाहिजे परंतु तसे होत नाही, ही बाब गंभीर आहे. याबाबत कार्यवाही सुरु असून त्याचा अहवाल श्री. गडकरी, कार्यकारी अभियंता यांनी जागेवर जावून प्रत्यक्ष पहाणी करुन अहवाल सादर केलेला असून ३३ गाळयांमध्ये नवभारत सह. गृह. संस्थेचे वितरण पत्र आहे तर ३५ गाळे बंद आढळले त्याबाबत आवश्यक कार्यवाही विकासका विरुध्द करण्यांत येईल असे आश्वासन दिले.

याबाबत सहमुख्य अधिकारी/ दु.व पु. मंडळ यांनी खुलासा केला तद्नंतर अशा प्रकारे २७ विकासकाविरुध्द मंडळातर्फे कार्यवाही सुरु करण्यांत आलेली असून त्यांचेकडून थकबाकी वसूल करुन त्यांना देण्यांत आलेल्या गाळयाचा ताबा मंडळ लवकरच घेणार आहे. त्यामध्ये वर नमूद केलेल्या विकासकांबाबतही कार्यवाही करण्यांत येईल.

सन्मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी म्हाडाने जमिन संपादन केलेल्या जागेवर एकत्रितपणे विकास करण्याचा प्रस्ताव होता, परंतु याबाबतची कार्यवाही होत नाही व बरेच वर्षे जमिन पडून राहते त्यानंतर सदर जमिनीवर अनधिकृत व्यक्ति आपले वास्तव्य करतात किंवा अनधिकृतपणे बांधकाम होवून इमारत ऊभी रहाण्याची शक्यता असते. तर असा प्रस्ताव आहे की, सदर जमिनीवर म्हाडाने विकास करावा असा प्रस्ताव मंडळातर्फे शासनास सादर करणेबाबत विनंती केली.

श्री. सेठ, उपमुख्य अभियंता यांनी आपल्या विभागातील संकल्पसिध्दी, पिंपळश्वर कृपा व त्याचा आजूबाजूच्या पीएमजीपीतंर्गत बांधलेल्या इमारतीचा समुह आहे, त्याबाबतची

आता सर्व प्रासेस पूर्ण होऊन सहा इमारतीचा प्रस्ताव सादर करण्यांत आलेला असल्याचे सांगितले.

यावर मा.मुख्य अधिकारी/ मुं.इ.दु.व पु.मं.यांनी सर्व कार्यकारी अभियंता व उपमुख्य अभियंता यांना सूचना केली की वरील विषयाबाबत आपआपल्या विभागातील पुनर्विकासाठीचे प्रस्ताव सादर कराणेबाबत कार्यवाही करावी.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी चिंचपोकळी येथे अलिकडे मोतीवाणी म्हणून एक इमारत असून तेथे मा.श्री.छगनभुजवळ साहेब यांचे शुभहस्ते भूमीपूजन झालेले असून सदर इमारतीचे पुनर्बांधणीचे काम प्रलंबित आहे व ही संपादन केलेली इमारत असून काम सुरु होण्यास वेळ लागतो. त्यामुळे अनधिकृत इमारती उभ्या रहातात, त्यामुळे याबाबीकडे लक्ष देण्याची गरज आहे, व याबाबत नाराजी व्यक्त केली.

यावर श्री. काळे, कार्यकारी अभियंता यांनी स्पष्ट केले की, रहिवाशांनी चालू असलेले काम बंद पाडले कारण नवीन धोरणानुसार त्यांना आता २२५ ऐवजी ३०० चा एरिया हवा आहे, त्यामुळे तशा प्रकारची नकाशात सुधारणा करुन प्रस्ताव महानगर पालिकेकडे मंजूरीस्तव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे, तसेच विकासकामार्फत पुनर्विकासाकरिता रहिवाशांमध्ये कार्यवाही सुरु असल्यामुळे सदर कामास वेग देता येत नाही व काम प्रलंबित आहे.

यावर मा.मुख्य अधिकारी यांनी स्पष्ट केले की, सदर इमारतीच्या पुर्नबांधणीचा प्रस्ताव अंतिम टप्पावर असून लवकरच याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येवून कार्यवाही सुरु होण्याची शक्यता आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी संजना या इमारतीचा जमिन भूसंपादनचा एक प्रस्ताव होता, त्याबाबत कार्यवाही होणे गरजेचे आहे. सदर इमारत पूर्ण खाली केलेली असून तेथे ७० टक्के भाडेकरुंचे प्रोत्साहन मिळालेले असून, सदर इमारतीत कोणते लोक राहतात याबाबत काहीच समजत नाही. सदर इमारतीस मा.सचिन अहिर यांचेसह आम्ही भेट दिली होती. सदर इमारतीस नेमलेला विकासक आपल्या लहरीपणाप्रमाणे काम करणार आहे का, सदर इमारतीच्या पुनर्विकासाचे काम मार्गी का लागत नाही.याबाबत विचारणा केली.

श्री.गडकरी, कार्यकारी अभियंता यांनी याबाबत स्पष्ट केले की, पुनर्विकासाकरिता ७० टक्के भाडेकरुंचे प्रोत्साहन नुकतेच मिळालेले आहे. आता काही कागदोपत्री प्रोसेस पूर्ण होणे शिल्लक आहे. लकरच याबाबत कार्यवाही करण्यांत येईल.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी मागील बैठकीत मुंबई बेटावरील अ वर्गातील खालील १६ मालमत्तावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्तावांवर चर्चा झाली.त्यामधील अ.क्र.६ वरील भुकर पहाणी क्र.१०९९, १/१०९९ आणि २/१०९९,

भायखळा विभाग, इ.क्र.४०-५० आणि ४० खांडिया स्ट्रीट, मुंबई-४०० ००२ येथील **'झैनब मंझील'**.यावर चर्चा झाली चर्चेअंती मा.सन्मा.सदस्यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, सदर प्रस्तावामध्ये ३ भूखंड असून ६० टक्के प्रोत्साहनात्मक चटई निर्देशांक देणेऐवजी ५० % का दिले म्हणून विचारणा केली होती. तद्नंतर यावर श्री.महिषी सचिव यांनी असे सांगितले की, अर्जदाराने सादर केलेल्या ३ भूखंडापैकी २ भूखंडाचे सुधारित मालकी पत्र सादर केल्यानंतर ६० % प्रोत्साहनात्मक चटई निर्देशांक देणेबाबतचा प्रस्ताव आहे.

यावर सर्व सन्मा.सदस्यांनी असे सांगितले की, प्रथम अर्जदाराने सुधारित मालकी पत्र सादर करावे, तद्नंतरच प्रस्ताव मंडळासमोर मान्यतेसाठी सादर करण्यांत यावा, त्यामुळे सदर प्रस्तावास मंजूरी न देता प्रलंबित ठेवण्यांत आला होत्या याबाबत असे स्पष्ट करण्यांत येत आहे की, सदर इमारतीतील भाडेकरु/रहिवाशी आम्हाला भेटले व त्यांनी आम्हा सर्व सन्मा.सदस्यांना विनंती केली की, आम्ही सदर सुधारित मालकी पत्र लवकर सादर करु व सदर भूखंडाचे क्षेत्र ०३० चौ.मि.व ३ चौ.मि.आहे व सुधारित मालकी पत्र . तरी ना हरकत मधील अट क्र.८ नुसार ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास हरकत नाही. भूखंडावर पुनर्विकास अडविला जात आहे. याकरिता आम्ही सर्व सन्मा सदस्य आपणांस विनंती करीत आहे की, सदरच्या पुनर्विकासाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी. त्यानुसार मागील बैठकीमध्ये ठेवलेल्या अ.क्र.६ वरील प्रस्तावास सर्वानुमते ठराव क्र. १२७८ नुसार मान्यता देण्याचे ठरले.

तद्नंतर सचिव श्री.महिषी यांनी सर्व सन्मा.सदस्यांच्या असे निदर्शनास आणून दिले की, ही बैठक शेवटची असल्यामुळे पुढील बैठक कधी होईल हे निश्चित नसल्यामुळे आजच्या बैठकीतील सर्व ठराव सर्वानुमते मंजूर करुन ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्व सन्मा.सदस्यांनी परवानगी दयावी.

या मुद्दास सर्व सन्मा.सदस्यानी मंजूरी दर्शविली.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी नमूद केले की,बैठक क्र.१४१मध्ये चर्चेलेल्या सर्व्हे क्र.१/७१६ माझगांव विभाग ना हरकत प्रमाणपत्राचा प्रस्ताव मंजूर झाला आहे. चुनीलाल मेहता कंपाऊड डि.पी.वाडी येथील १६७ निवासी व ७ अनिवासी एकूण १७४ भाडेकरुंच्या ब-या तक्रारी प्राप्त झाल्याअसुन पुढील मंजूरी देण्यापूर्वी सखोल चौकशी करण्यांत यावी, अशी त्यांनी अध्यक्ष महोदयांना विनंती केली.

**वरील सविस्तर चर्चेअंती कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आले.**

**बाब क्रमांक - १४४- (२)**

**विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या विविध विभागातील प्रस्तावित दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रकांना प्रशासकिय मान्यता देण्याबाबत**

**१. परिमंडळ- १ मधील (अ,सी-१,सी-२ व सी-३) ०८ इमारती.**

-----0---0----

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. **२१ ते २९** वर सादर करण्यांत आलेला आहे.
सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १४४/ १२८०**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार ०८ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु. १,०६,१३,८४२ /-(रुपये- एक कोटी सहा लक्ष तेरा हजार एकशे चौसष्ट फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.६९,५२,७३२/- (रुपये एकोणसत्तर लक्ष बावन्न हजार सातशे बत्तीस फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १४४ -२ (२)**

विषय - २. **परिमंडळ-२** मधील (डी-१, डी-२, व ग-दक्षिण) ०८ **इमारती.**

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. **३१ ते ४१** वर सादर करण्यांत आलेला आहे.
सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १४४/१२८१**

**मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस** आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ०८ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु. २,३१,५७,२४२ /-(रुपये- दोन कोटी एकतिस लक्ष सत्तावन्न हजार दोनश बेचाळीस फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. १,३९,९८,३७९ /- (रुपये एक कोटी एकोनचाळीस लक्ष अठयानव हजार तिनशे एकोनऐंशी फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

----------o-----o----------

**बाब क्रमांक - १४४. २ (३)**

विषय - **परिमंडळ-४** मधील (ग-उत्तर फ-उत्तर व फ-दक्षिण) **०४ इमारती**

---

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. ४३ ते ५१ वर सादर करण्यांत आलेला आहे.
सदर प्रस्तावावर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक - १४४/१२८२

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ०४ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.८३,६१.१३१ /-(रुपये- त्र्यैऐंशी लक्ष एकसष्ट हजार एकतीस अठरा फक्त ) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु. ५९,४१,८७० /- (रुपये एकोणसाठ लक्ष एकेचाळीस हजार आठशे सत्तर फक्त ) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

----------o-----o-----------

बाब क्रमांक - १४४. ३ पुनर्विकास

विषय - **मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.**

--------------o-------o-----------

मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासा करीता ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतचे ११ प्रस्ताव पृष्ठ क्र.५३ ते १०० वर मंजूरीसाठी सादर करण्यांत आले आहेत. सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

१. भुकर पहाणी क्र.१३३७, मांडवी विभाग, उपकर क्र. बी-२३६७ इ.क्र.७०, कांबेकर स्ट्रीट, मुंबई येथील मालमत्ता.
२. भुकर पहाणी क्र.१३१५, मांडवी विभाग, उपकर क्र.३१६० इ.क्र.१३ चुनाम किल्न रोड, मुंबई येथील मालमत्ता
३. भुकर पहाणी क्र.४१५, माझगांव विभाग, उपकर क्र. ५०३४(१) आणि ५०३४(१अे) इ.क्र.२०२अे आणि २०२बी, मस्करंहस रोड, मुंबई ४०० ०१० येथील मालमत्ता.
४. भुकर पहाणी क्र.६०४, गिरगाव विभाग, उपकर क्र. ड/१६३५-३५(ए) इ.क्र.२३२-२३२ए, व्ही.पी. रोड, मुंबई, **'जैन भवन'**, म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्ता.
५. भुकर पहाणी क्र.३३०, गिरगाव विभाग, उपकर क्र. ड/५८० इ.क्र.३५डी/८ तात्यासाहेब घारपूरे पथ, मुघबाट क्रॉस लेन, मुंबई येथील मालमत्ता
६. भूकर पहाणी क्र.७६३, मलबार कंबाला हिल विभाग, उपकर क्र. डी-३५२१ (२), इ.क्र.६१-बी,भुलाबाई देसाई रोड, मुंबई-२६ येथील **'अमर निवास'** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्ता.
७. अंतिम भूखंड क्र.९२९,टीपीएस-४,माहिम विभाग, उपकर क्र.ग/दक्षिण-२८५७ इ.क्र.१५,१५-डी,खेड गल्ली,प्रभादेवी, मुंबई२५येथील **'डॅब्रो हाऊस'** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्ता.
८. अंतिम भूखंड क्रं.१०३८,टीपीएस नं.४,माहिम विभाग, उपकर क्र. ग/दक्षिण,-३०५७(५), इ.क्रं.७,पहिली खेड गल्ली,सयानी रोड,प्रभादेवी, मुंबई-२५ येथील **'काशि सदन'** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्ता.

९. अंतिम भूखंड क्र.११०, टीपीएस-३,माहिम विभाग, इ.क्र.५१, उपकर क्र.ग/उ-४०९०(२बी-२बीबी),मनोरमा नगरकर रोड, टायकल वाडी,माहिम, मुंबई-१६ येथील '**स्वस्तिक हाऊस**' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्ता

१०. भूकर पहाणी क्र.४०४/१०, माटुंगा विभाग, प्लॉट क्र.४४०, दादर-माटुंगा इस्टेट,इमारत क्र.१२, उपकर क्र.फ/उत्तर-७८३२, श्रध्दानंद रोड, माटुंगा,मुंबई १९ येथील '**अफ्रिका कॉटेज**' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्ता

११. भूकर पहाणी क्र.९(भाग),दादर-नायगांव विभाग,इ.क्र.२८-बी, उपकर क्र.फ/द-३८४(१),जगन्नाथ भाटनकर मार्ग,परेल, मुंबई -१२ येथील '**बाग-ई-कौसर**' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्ता

<u>ठराव क्रमांक १४४/१२८३</u>

मुंबई बेटावरील अ वर्गातील खालील ११ मालमत्तावरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्तावास नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१. भुकर पहाणी क्र.१३३७, मांडवी विभाग, उपकर क्र. बी-२३६७ इ.क्र.७०, **कांबेकर स्ट्रीट,** मुंबई येथील मालमत्ता.

२. भुकर पहाणी क्र.१३१५, मांडवी विभाग, उपकर क्र.३१६० इ.क्र.१३ **चुनाम किल्न रोड, मुंबई येथील मालमत्ता**

३. भुकर पहाणी क्र.४१५, माझगांव विभाग, उपकर क्र. ५०३४(१) आणि ५०३४(१अे) इ.क्र.२०२अे आणि २०२बी, मस्करंहस रोड, मुंबई ४०० ०१० येथील मालमत्ता.

४. भुकर पहाणी क्र.६०४, गिरगाव विभाग, उपकर क्र. ड/१६३५-३५(ए) इ.क्र.२३२-२३२ए, व्ही.पी.. रोड, मुंबई, '**जैन भवन**', म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्ता.

५. भुकर पहाणी क्र.३३०, गिरगाव विभाग, उपकर क्र. ड/५८० इ.क्र.३५डी/८ तात्यासाहेब घारपूरे पथ, मुघबाट क्रॉस लेन, मुंबई येथील मालमत्ता

६. भूकर पहाणी क्र.७६३, मलबार कंबाला हिल विभाग, उपकर क्र. डी-३५२१ (२), इ.क्र.६१-बी,भुलाबाई देसाई रोड, मुंबई-२६ येथील '**अमर निवास**' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्ता.

७. अंतिम भूखंड क्र.९२९,टीपीएस-४,माहिम विभाग, उपकर क्र.ग/दक्षिण-२८५७ इ.क्र.१५,१५-डी,खेड गल्ली,प्रभादेवी, मुंबई२५येथील '**डॅब्रो हाऊस**' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्ता.

८. अंतिम भूखंड क्र.१०३८,टीपीएस नं.४,माहिम विभाग, उपकर क्र. ग/दक्षिण,-३०५७(५), इ.क्र.७,पहिली खेड गल्ली,सयानी रोड,प्रभादेवी, मुंबई-२५ येथील '**काशि सदन**' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्ता

९. अंतिम भूखंड क्र.११०, टीपीएस-३,माहिम विभाग, इ.क्र.५१, उपकर क्र.ग/उ-४०९०(२बी-२बीबी),मनोरमा नगरकर रोड, टायकल वाडी,माहिम, मुंबई-१६ येथील '**स्वस्तिक हाऊस**' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्ता

१०. भूकर पहाणी क्र.४०४/१०, माटुंगा विभाग, प्लॉट क्र.४४०, दादर-माटुंगा इस्टेट,इमारत क्र.१२, उपकर क्र.फ/उत्तर-७८३२, श्रध्दानंद रोड, माटुंगा,मुंबई १९ येथील '**अफ्रिका कॉटेज**' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्ता

११. भूकर पहाणी क्र.९(भाग),दादर-नायगांव विभाग,इ.क्र.२८-बी, उपकर क्र.फ/द-३८४(१),जगन्नाथ भाटनकर मार्ग,परेल, मुंबई -१२ येथील '**बाग-ई-कौसर**' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालमत्ता.

बैठकीच्या शेवटी सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी मंडळाच्या सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाचे आभार मानून त्यांनी मागील चार वर्षाच्या कारकिर्दीत मंडळातंर्गत केलेल्या चांगल्या/वाईट कामाच्या उल्लेख केला तसेच मा.मुख्य अधिकरी, श्री.हजारे साहेब,श्री.तानाजी संत्रे साहेब व आताचे मा. मुख्य अधिकारी,श्री.महेंद्र वारभुवन यांचे कारकिर्दीत काम करताना आम्हा सर्व सन्मा.सदस्यांना चांगल्याच अनुभव आला तसेच सहमुख्य अधिकारी डॉ.श्री.रमेश सुरवाडे यांनीही पदभार सांभाळल्यापासून ज्यापध्दतीने संक्रमण शिबिर विभागातील नस्त्याची वर्गवारी,नोंदणी,स्कॅनिंग असा जो उपक्रम राबविला तसेच त्यांनी जे नवीन प्रकारे एक सॉफ्टवेअर तयार केलेले आहे, ते सुध्दा कौतुकास्तव आहे. तसेच आमच्या कारकिर्दीत श्री.सेठ, उपमुख्य अभियंता व इतर अधिका-यांनी व्हेकेशन नोटीसचा एक चांगला फॉर्मेट तयार करण्यांत आला, याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच भविष्यात अशाप्रकारे मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे कामकाज सुरु राहिल व मंडळाची प्रतिमा उंचावेल अशी आशा व्यक्त केली.

बैठकीच्या शेवटी सहमुख्य अधिकारी डॉ.श्री.रमेश सुरवाडे यांनी प्रथम सर्व सन्मा सदस्याचे कौतुक केले व त्यांनी पुढे असेही सांगितले की, आम्ही फक्त कार्यालयात बसून काम करतो परंतु आपल्या संपर्क हा लोकांच्या मनापर्यंत व लोक आपल्या अडचणी आपणांस सांगतात त्या आपण आमच्यासमोर मांडतात, त्यासाठी आपली ही नियुक्त मंडळावर खास बाब म्हणून करण्यांत येते, त्यामुळे आपण करीत असलेले कार्य फार महान असून ते फार मोठे आहे. याबद्दल आपले सर्वांचे अभिनंदन करतो, तसेच यापुढेही आपण मंडळात येणार आहात आपल्या अनुभवाची मंडळास गरज असल्यामुळे भविष्यात आपल्या कोणत्याही सूचना असतील तर त्याआपण जरुर कराव्यात, तसेच पुढे असेही सांगितले की, संक्रमण शिबिरातील जे गाळे आहेत ते मंडळास तेवढे लागत नाही. त्यामुळे भविष्यात जेवढया गाळयाची मंडळास आवश्यकता असेल तेवढे गाळे ठेवून बाकीचा गाळयाचा निर्णय भविष्यात घेण्यांत येईल, तसेच सदर गाळयांच्या संरक्षण व सुरक्षा व्यवस्था आपल्याकडे उपलब्ध नसल्यामुळे तसेच आपल्याकडे भाडेवसुलीसाठीही पुरेशा यंत्रणा उपलब्ध नाही. त्यामुळे त्याची देखभालही आपल्याकडून होत नाही. त्यामध्ये घुसखोरी होते, यासर्व गोष्टींना आळा घालण्याचा पर्यंत पुढील कालावधीत होणार आहे. तद्नंतद सर्व सदस्यांचे आभार मानून त्यांनी आतापर्यंत केलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. व मा.मुख्य अधिकारी यांना विनंती केली की, त्यांनी सर्व सन्मा.सदस्यांना फुलगुच्छ देणेबाबत विनंती केली.

यानंतर मा.श्री.महेंद्र वारभुवन मुख्य अधिकारी/मुं.इ.दु.व पु.मंडळ यांनी सर्व सन्मा.सदस्यांच्या स्वागत केले व त्यांनी आजपर्यत केलेल्या कामांचे कौतुक करुन त्यानी भविष्यात अशा प्रकारे जनहिताची कामे करणेबाबत शुभेच्छा दिल्या.

तदनंतर सचिव, श्री.महिषी यांनी सर्व सन्मा.सदस्यांच्या अभिनंदन केले व त्यांनी मागील चार वर्षात केलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. आजची बैठक संपल्याचे जाहीर केले.

सचिव तथा निवासी कार्यकारी अभियंता
मुं.इ.दु.व पु.मंडळ.

मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी,
मुं.इ. दु.व पु.मंडळ

तद्नंतर सचिव श्री.महिषी यांनी सर्व सन्मा.सदस्यांच्या अभिनंदन केले व त्यांनी मागील चार वर्षात केलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले. आजची बैठक संपल्याचे जाहीर केले.

सचिव तथा निवासी कार्यकारी अभियंता
मुं.इ.दु.व पु.मंडळ.

स्वाक्षरीत/-
सहमुख्य अधिकारी
मुं.इ.दु.व.पु.मंडळ

मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी,
मुं.इ. दु.व पु.मंडळ